


सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक




https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# भारतपर्व महोत्सवात 'मधाचे गाव' संकल्पनेवर आधारित महाराष्ट्राचा चित्ररथ

## यावर्षी चित्ररथांसाठी 'सुवर्ण भारत: वारसा आणि विकास' ही मध्यवर्ती संकल्पना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नवी दिल्ली**

लाल किल्ला परिसरात भारत पर्व महोत्सवाचे आयोजन प्रजासत्ताक दिनानिमित्त होणार असून या ठिकाणी महाराष्ट्र राज्याचा 'मधाचे गाव' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ असणार आहे. दरवर्षी केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्यावतीने लाल किल्ला येथे भारतपर्व महोत्सवाचे आयोजन प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यानिमित्त केले जाते. यावर्षी या महोत्सवात महाराष्ट्राचा चित्ररथ दर्शविण्यात येणार आहे. महाराष्ट्रासह बारा राज्यातील चित्ररथ ही इथे असणार आहेत. दिनांक २६ ते २९ जानेवारी दरम्यान भारतपर्व महोत्सव असेल.

हे वर्ष संविधानाचे अमृत महोत्सव वर्ष म्हणून साजरे केले जात असून, यावर्षी चित्ररथांसाठी 'सुवर्ण भारत: वारसा आणि विकास' ही मध्यवर्ती संकल्पना आहे. या संकल्पनेच्या आधारावर महाराष्ट्रराज्याने 'मधाचे गाव' असा चित्ररथ तयार केला.मध माशांचे पर्यावरणाच्या आणि मानवी जीवनाच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्व आहे. मधाचे व्यावसायिक महत्त्व लक्षात घेऊन, स्थानिक रोजगार निर्मिती आणि उत्पन्नाचे स्रोत निर्माण करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने २०२२ मध्ये 'मधाचे गाव' ही योजना सुरू केली. या योजनेचा मुख्य उद्देश स्थानिक रोजगार निर्मिती करणे आणि गावे आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे हा आहे. त्याचबरोबर पर्यटन व पर्यावरण यासाठीही ही योजना महत्त्वाची आहे.




**कसा असेल 'मधाचे गाव' चित्ररथ**

चित्ररथाच्या पुढच्या भागात फुलांनी सजवेलेली मधमाशीचे आकर्षक शिल्प बसवले आहे. या मधमाशीभोवती लहान मधमाशा आणि काही फुले दाखवली आहेत. भव्य मधमाशीच्या पंखांची हालचाल दाखवण्यात आली असून लहान मधमाशा हवेत उडताना दिसतील. चित्ररथाच्या मागील भागात एक विशाल मधमाशाचे पोळ चित्रित करण्यात आले आहेत. नैसर्गिकरित्या असणा-या मधुमाशींच्या पोळची अचूक प्रतिकृती बनविली आहे. मधमाश्या त्यांच्याभोवती फिरताना दिसतात. मध उत्पादनाचे टप्पे मोठ्या मधाच्या पोळ जवळ दाखवले आहेत. मध व्यवसायातील महत्त्वपूर्ण उप-उत्पादने देखील दर्शविली आहेत. फुलांच्या परागीकरणातून रस शोषुण घेणा-या मधमाशी प्रतिकृती दर्शविण्यात आली आहे. मध निर्मितीच्या विविध टप्प्यातील प्रक्रिया दर्शविण्यात आले आहेत. मधमाशीपालनात वापरल्या जाणाऱ्या खोक्यांवर मधाचे गाव योजनेत समाविष्ट असलेल्या काही गावांची नावे लिहिली आहेत.

सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनातून सदरील चित्ररथ तयार झाल्याची माहिती सांस्कृतिक विभागाचे संचालक विभीषण चवरे यांनी दिली आहे.

# बेकायदेशीर स्थलांतरितांविरुद्ध कठोर कारवाई करा केंद्रीय गृह मंत्रालयाचे महाराष्ट्र सरकारला निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नवी दिल्ली**

अभिनेता सैफ अली खानवरील हल्ल्यात बांगलादेश कनेक्शनचा मुद्दा ऐरणीवर आल्यानंतर, महाराष्ट्रात बेकायदेशीर स्थलांतरितांवर कडक कारवाई सुरू झाली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक आणि इतर संबंधित संस्थांना बांगलादेश आणि म्यानमारमधून




महाराष्ट्रात येणाऱ्या बेकायदेशीर स्थलांतरितांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. या संदर्भात शिवसेना (शिंदे गट) उपनेते आणि माजी खासदार राहुल शेवाळे यांनी अमित शाह यांच्याकडे बांगलादेशी घुसखोरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. या मागणीच्या आधारे गृह मंत्रालयाने सैफ अली खानवरील हल्ल्यानंतर कठोर कारवाई करण्याचे निर्देश जारी केले आहेत.

राहुल शेवाळे यांनी नोव्हेंबर २०२४ मध्ये केंद्रीय गृहमंत्र्यांना पत्र लिहीले होते. यात टाटा सोशल सायन्स इन्स्टिट्यूटच्या अहवालाचा हवाला देत महाराष्ट्र आणि मुंबईत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या बांगलादेशींवर कारवाई करण्याची मागणी केली होती. टाटा इन्स्टिट्यूटने त्यांच्या अहवालात म्हटले होते की, बांगलादेशी मुंबई आणि महाराष्ट्रात बेकायदेशीरपणे राहत आहेत आणि ते गुन्हेगारी कारवायांमध्ये सामील होऊ शकतात, ज्यामुळे मुंबईच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो.

# वाल्मीक कराड अन् इतर आरोपींनी एकाच गाडीतून केला प्रवास; नवे सीसीटीव्ही फुटेज आले समोर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३ बीड**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील एक आरोपी अजूनही फरार आहे. तर बाकीच्या मुख्य तीन आरोपींना पुण्यातून ताब्यात घेतले आहे, तर वाल्मीक कराड याला पवनचक्की कंपनीला खंडणी मागितल्या प्रकरणी अटक केली आहे.दरम्यान, आता एक सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाला आहे. या फुटेजवरुन ३१ डिसेंबरच्या आधी वाल्मीक कराडने बीड ते पुणे प्रवास केल्याचे समोर आले आहे.

खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड व इतर आरोपी सीआयडी ला शरण




येण्यापूर्वी बीड वरून पुण्याला गेल्याचे समोर आले आहे. या बाबतीत पुष्टी देणारे तीन आलिशान गाड्यांचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहेत.३० डिसेंबरच्या रात्री सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्गावर तीन आलिशान गाड्यांमधून आरोपी पुण्याला गेल्याची चर्चा आहे. बीडच्या मांजरसुंबा येथे एका हॉटेलवर जेवण केले, तसेच एका पेट्रोल पंपावर गाडीत डिझेल भरले.याच गाड्या धाराशिव जिल्ह्यातील पारगाव टोल नाका येथे रात्री १.३६ वाजता पास झाल्या. या गाड्यांमध्ये बसून आरोपी गेला अशी चर्चा आहे. तसेच याच आलीशन गाड्यांनी आरोपींना फरार होण्यास मदत केली असावी अशी शक्यता आहे.

पाषाण येथे सीआयडीच्या ऑफिसला शरण येताना ज्या गाडीतून वाल्मीक कराड आला. ती गाडी याच ताफ्यातील होती. यामुळे आता या प्रकरणात आणखी ट्विस्ट आला आहे.

# बाळासाहेब ठाकरेंना 'भारतरत्न' जाहीर करावे उद्धव ठाकरे गटाची केंद्र सरकारकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी ट्विटरवर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंना आदरांजली वाहिली आहे. जर आपल्याला बाळासाहेब ठाकरेंचा खरंच सन्मान करायचा असेल तर येत्या २६ जानेवारीला बाळासाहेब ठाकरे यांना भारतरत्न जाहीर करावं. ही महाराष्ट्रातील आणि देशातील हिंदुंची मागणी आहे ती मान्य करावी अशी मागणी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. शिवसेना भवनात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी खासदार अरविंद सावंत आणि नेते



दिवाकर रावतेही उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेत संजय राऊत म्हणाले की, देशातील लोकमान्य नेते असलेले बाळासाहेब ठाकरे यांचा आज वाढदिवस आहे. २०२६ मध्ये बाळासाहेब ठाकरेंचं जन्मशताब्दी वर्ष सुरू होईल. बाळासाहेब ठाकरे असे नेते होते जे ५० वर्ष कुठल्याही संविधानिक, सत्तेच्या पदावर बसले नाही तरीही त्यांनी जनतेवर अधिराज्य केले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, महात्मा गांधी यांच्यानंतर इतके यशस्वी नेते बाळासाहेब ठाकरे होते. बाळासाहेब ठाकरेंनी महाराष्ट्रातील मराठी माणसांच्या स्वाभिमानाची लढाई लढली. हिंदूवर हल्ले सुरू झाले तेव्हा ते हिंदूसाठीही उभे राहिले. आज अयोध्येत राम मंदिर उभं राहिले आहे ते बनवण्यात आणि त्यामागच्या आंदोलनात बाळासाहेब ठाकरेंचं योगदान सर्वोच्च आहे. आज बाळासाहेब ठाकरे नाहीत, पण त्यांचे विचार आजही जिवंत आहेत. बाळासाहेब ठाकरे यांनी कधी स्वत:साठी काही मागितले नाही. मात्र राज्यातील, देशातील आणि जगभरातील हिंदुंची मागणी आहे. बाळासाहेब ठाकरे यांना देशातील सर्वोच्च सन्मान मिळाला पाहिजे असं त्यांनी म्हटलं.

दरम्यान, स्वातंत्र्यवीर सावरकरांना भारतरत्न द्यावा ही आम्ही वारंवार सभागृहात आणि बाहेरही मागणी केली. या सगळ्यांचे वीर सावरकरांवरील प्रेम ढोंगी आहे. या लोकांचे हिंदुत्व ढोंगी आहे. हिंदुत्वासाठी २ नेत्यांनीच सर्वोच्च बलिदान दिले ते स्वातंत्र्यवीर सावरकर, बाळासाहेब ठाकरे, वीर सावरकरांचा सन्मान द्यावा. वीर सावरकरांचा विचार बाळासाहेब ठाकरेंनी पुढे नेले. मात्र या २ हिंदुहृदयसम्राटांना उपेक्षित ठेवण्याचं काम स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्या सरकारने केले आहे असा आरोप संजय राऊतांनी केला.




# प्रताप सरनाईकांकडून एसटीच्या भाडेवाढीचे संकेत

## अजित पवार म्हणाले, खराब बस बघून लोक म्हणतील कशाची भाडेवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई**

एसटी संभाव्य भाडेवाढीवरून मंत्रिमंडळातच विसंवाद असल्याचे समोर आलं आहे. एकीकडे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून दरवाढीचा संकेत देण्यात आले आहेत. लवकरच दरवाढीबाबत निर्णय घेऊ असं प्रताप सरनाईक यांनी म्हटल आहे. तर दुसरीकडे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एसटीच्या भाडेवाडीची शक्यता फेटाळून लावली आहे. मंत्रिमंडळासमोर असा कुठलाही



प्रस्ताव आला नसल्याची माहिती अजित पवार यांनी दिली.

आमच्याकडे लोकप्रतिनिधी म्हणून असा निर्णय आणला जातो. खरंतर दरवर्षी डिझेलच्या आणि सीएनजीच्या किमती वाढत असतात, खर्च दिवसेंदिवस वाढत असतो. त्यानुसार ऑक्टोबरमध्ये पाच टक्के जी भाडेवाढ आहे अपरिहार्य असते. यापूर्वी हे चालत आलं होतं. परंतु मध्यंतरी तीन ते चार वर्षांच्या काळात ही भाडेवाढ झाली नाही. कदाचित आजच्या बैठकीमध्ये तो विषय असू शकतो. तो विषय प्राधिकरणामध्ये मंजूर झाल्यानंतर आमच्या मान्यतेसाठी येईल तेव्हा त्या विषयावर चर्चा होईल, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले.

अजून आमच्या पुढे तशा प्रकारचा प्रस्ताव आलेला नाही. जर उद्याच्याला काही भाडेवाढ करायची म्हटलं आणि बसेस खराब असतील तर लोक म्हणतील कशाची भाडेवाढ करता आहात. त्यामुळे आम्ही चर्चा करू आणि त्यामधून योग्य मार्ग काढण्याचा प्रयत्न करू, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.यापूर्वी २६ ऑक्टोबर २०२१ रोजी एसटी महामंडळाची १७.१७ टक्के भाडेवाढ झाली होती. त्यानंतर आता महामंडळाने राज्य सरकारला १४.१३ टक्के भाडेवाढीचा प्रस्ताव दिला आहे.

## संपादकीय ......

# पंतप्रधानांची नववर्षात धडाक्यात सुरुवात

२०२५ मधील पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत शेतकऱ्यांच्या कल्याणावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करून नववर्षाची सुरुवात झाली. सरकारने शेतकऱ्यांसाठी खतांच्या किफायतशीर किमती खात्रीशीर करून, डायअमोनियम फॉस्फेट (डीएपी)साठी एकरकमी विशेष पॅकेज देण्यास मंजुरी दिली. हा निर्णय भारताचा कृषीविषयक कणा मजबूत करण्याप्रति सरकारची वचनबद्धता अधोरेखित करतो. त्याच दिवशी, पंतप्रधान मोदी यांनी गायक-अभिनेता दिलजीत दोसांझ आणि बुद्धिबळ ग्रँडमास्टर कोनेरू हंपी यांसारख्या सांस्कृतिक प्रतीकांची भेट घेतली, ज्यातून कला, क्रीडा आणि इतर क्षेत्रांत उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यावर पंतप्रधानांचा भर असल्याचे दिसून येते.

३ जानेवारी रोजी, पंतप्रधान मोदी यांनी दिल्लीत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत मूळ जागी, नव्याने बांधलेल्या १,६७५ सदनिका हस्तांतरित केल्या, ज्यामुळे हजारो कुटुंबांची राहण्याची उत्तम सोय झाली आहे. सुरजमल विहार येथील ईस्टर्न कॅम्पस, द्वारका येथील वेस्टर्न कॅम्पस आणि नजफगढमधील वीर सावरकर महाविद्यालय यांसह ६०० कोटींहून अधिक खर्चाच्या तीन परिवर्तनात्मक शैक्षणिक प्रकल्पांची पायाभरणीही त्यांनी केली. शैक्षणिक पायाभूत सुविधा वाढवणे आणि भावी पिढ्यांना प्रेरित करणे, हा या प्रकल्पांचा उद्देश आहे. ४ जानेवारी रोजी ग्रामीण भारत महोत्सवादरम्यान ग्रामीण विकासाप्रति सरकारची वचनबद्धता केंद्रस्थानी होती, हा जीआय-प्रमाणित ग्रामीण उत्पादनांना प्रोत्साहन तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न होता. हा उपक्रम ग्रामीण भारताला सशक्त बनवण्याच्या आणि जागतिक अर्थव्यवस्थेत समाकलित करण्याच्या उद्दिष्टाला अनुरूप आहे. त्याचबरोबर, पंतप्रधान मोदी यांनी मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांच्यासह जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान अग्रणींशी संवाद साधला, ज्यांनी भारतात कृत्रिम बुद्धिमत्ता संबंधित पायाभूत सुविधांमध्ये ३ अब्ज डॉलर्स गुंतवणुकीची घोषणा केली. या चर्चांमध्ये स्वदेशी नवोन्मेषाला चालना देणे आणि स्वयंपूर्ण तंत्रज्ञान परिसंस्था उभारणे यावर प्रामुख्याने भर होता.

५ जानेवारी रोजी, साहिबाबाद आणि अशोकनगर यांना जोडणाऱ्या नमो भारत ट्रेन कॉरिडॉरचे उद्घाटन तसेच ओडिशा, तेलंगणासह जम्मू आणि काश्मीरमधील विविध रेल्वे पायाभूत सुविधांचा विकास यामुळे पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती मिळाली. हे प्रकल्प म्हणजे पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली वाहतुकीच्या जाळ्याच्या आधुनिकीकरणात भारत करत असलेल्या वेगवान प्रगतीचे प्रतीक आहेत.

७ जानेवारी रोजी, पंतप्रधान मोदी यांनी आंध्र प्रदेशमध्ये दोन महत्त्वाच्या प्रकल्पांचा शुभारंभ केला; आयात केल्या जाणाऱ्या औषधी घटकांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी १,८७७ कोटींचा 'बल्क ड्रग पार्क' उपक्रम आणि दररोज १,५०० टन हरित हायड्रोजनचे उत्पादन करण्याचे उद्दिष्ट असलेले 'ग्रीन हायड्रोजन हब'; या उपक्रमांमुळे नवीकरणीय ऊर्जा आणि औषध निर्मिती क्षेत्रात भारताला आघाडीचे स्थान मिळाले आहे. ९ जानेवारी रोजी 'जीनोम इंडिया' प्रकल्पाच्या उद्घाटनासह विज्ञान क्षेत्रात भारताने एक महत्त्वपूर्ण पाऊल पुढे टाकले आहे, जे भारतीयांच्या अनुवांशिक विविधतेला मॅप करेल आणि अनुवांशिक विकारांवर आरोग्यसेवा उपायांना चालना देईल. त्याच दिवशी, पंतप्रधान मोदी यांनी भुवनेश्वर येथे प्रवासी भारतीय दिवस संमेलनाला संबोधित केले, परदेशस्थ भारतीय समुदायाच्या उपलब्धी आणि जागतिक स्तरावरील त्यांचे योगदान साजरे केले. १२ जानेवारी रोजी, पंतप्रधान मोदी राष्ट्रीय युवा दिन आणि स्वामी विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग'मध्ये सहभागी झाले. या उपक्रमाने युवा नवोन्मेषक आणि यशस्वी व्यक्तींना विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी आणि विकसित भारताची कल्पना मांडण्यासाठी एकत्र आणले, ज्यातून युवकांना सक्षम बनविण्याप्रति सरकारच्या वचनबद्धतेला दुजोरा मिळाला.

१३ जानेवारी रोजी पंतप्रधान मोदी यांनी जम्मू आणि काश्मीरमधील सोनमर्ग बोगद्याचे उद्घाटन केले, ज्यामुळे संपर्क व्यवस्था सुधारली आणि राष्ट्रीय सुरक्षा वाढवण्याबरोबरच पर्यटनाला चालना दिली. त्यांनी श्रमिक आणि अभियंत्यांशी वैयक्तिकरित्या संवाद साधला तसेच त्यांच्या प्रयत्नांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांना उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी पुरस्कार

## आयोगाकडून राष्ट्रीय मतदारदिनी पुण्यात होणार गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अकोला,-** राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून लोकसभा निवडणुकीत उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी पुरस्कारासाठी अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांची निवड झाली आहे. राष्ट्रीय मतदारदिनी (२५ जानेवारी) पुणे येथील राज्यस्तरीय कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



०६- अकोला लोकसभा मतदारसंघाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी अजित कुंभार काम पाहिले. त्यातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल हा पुरस्कार मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने जाहीर केला आहे.

त्याबद्दल अतिरिक्त जिल्हाधिकारी रामदास सिद्धभट्टी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेश परंडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, उपविभागीय अधिकारी अनिता भालेराव आदींनी पुष्पगुच्छ देऊन जिल्हाधिका-यांचे अभिनंदन केले. 'निवडणुकीच्या काळात सर्व अधिकारी- कर्मचा-यांनी अविश्रांत परिश्रम घेऊन निवडणुकीची प्रक्रिया सुव्यवस्थितपणे पार पाडली. सर्वांच्या योगदानामुळे जिल्ह्याला पुरस्कार प्राप्त झाला', असे सांगून जिल्हाधिका-यांनी सर्व सहका-यांचे अभिनंदन केले.

# ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अकोला,-** नजिकच्या काळात (दि. ४ मार्चपर्यंत) निवडणूक होणा-या २० ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजनभवनात आज काढण्यात आली. सोडतीनुसार निश्चित आरक्षणाची माहिती जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी जाहीर केली आहे.




तालुकानिहाय ग्रामपंचायती व आरक्षण पुढीलप्रमाणे : तेल्हारा - उमरी (अनुसूचित जाती महिला), अकोला रूपराव (सर्वसाधारण), अकोट- केळपाणी (अनुसूचित जमाती महिला), केळपाणी बु. (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग), मूर्तिजापूर- कव्हळा (अनुसूचित जमाती महिला), शेलू बाजार (सर्वसाधारण महिला), किनखेड (सर्वसाधारण महिला), लंघापूर (सर्वसाधारण).

बाळापूर- हिंगणा निंबा (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला), शिंगोली (सर्वसाधारण), बार्शिटाकळी- भेंडीसूत्रक (सर्वसाधारण महिला), चोहोगांव (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग), पातूर- सांगोळा (सर्वसाधारण महिला), कोठारी बु. (सर्वसाधारण), आस्टुल (सर्वसाधारण महिला), भंडारज बु. (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला), तुलंगा बु. (सर्वसाधारण).अकोला- आखतवाडा (सर्वसाधारण स्त्री), अनकवाडी (अनुसूचित जाती).

# ऊस पीक वाढीसाठी आंतरमशागतीची 'ही' कामे कराच

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक** - उसाची उगवणझाल्यावर पीक वाढीसाठी नांगे भरणे, तण नियंत्रण, जमीन भुसभुशीत करणे, वरखते देणे, तगरणी किंवा बाळ बांधणी करणे व मोठी बांधणी करणे, इ. आंतरमशागतीच्या कामांचा समावेश होतो. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात...

१) नांगे भरणे : ऊसाची उगवण होऊन दोन रोपात ३५ ते ६० सें.मी. पेक्षा जास्त अंतर असल्यास त्या ठिकाणी पाटात लावलेल्या रोपांचा वापर करून नांगे भरावेत.

२) तण नियंत्रण : उगवणीनंतर एक खुरपणी करून उसाच्या ओळीमध्ये ४५ दिवसांनी हेक्टरी ५ टन पाचटाचे आच्छादन केल्यास तणांची वाढ होत नाही, ओलावा टिकून राहतो व जमिनीत




सेंद्रिय पदार्थांची भर पडते. खुरपणीनंतर उसात दातेरी कोळपे चालवल्यास तणांचा बंदोबस्त होतो. ट्राझीन हेक्टरी ५ किलो किंवा मेट्रीब्युझीन हेक्टरी १.५ कि. ६०० लिटर पाण्यात मिसळून वाफसा अवस्थेत, लागवडीनंतर एका आठवड्यात फवारल्यास तणांचा बंदोबस्त होतो.



३) जमीन भुसभुशीत करणे : लागवडीनंतर ३ ते ३।। महिन्याच्या काळात दातेरी कोळपे, कृषीराज, लोखंडी नांगर, कुळव या अवजारांचा वापर करून जमीन भुसभुशीत करावी.

४) वरखते : पीक ६ ते ८ आठवड्याचे झाल्यानंतर नत्राचा दुसरा हप्ता कृषिराज अथवा लाकडी नांगराने पेरून द्यावा अथवा नत्र खत सरीमध्ये देऊन त्यासाठी लोखंडी नांगराने उसाच्या बुंध्यास भर दिल्याने खत जमिनीत चांगले मिसळण्यास मदत होते.

६) मोठी बांधणी : पीक साडे चार ते ५ महिन्याचे, २ ते ३ कांड्या सुटण्याच्या अवस्थेत पक्की किंवा मोठी बांधणी करावी. सुरुवातीला लोखंडी नांगराने संपूर्ण वरंबा फोडून घ्यावा. सायन कुळवाने माती भुसभुशीत करावी. रिजर चालवून वरंब्याच्या ठिकाणी सरी पाडून बुंध्यास मातीची भर लावावी. वरखताचा शेवटचा हप्ता द्यावा.

**डॉ. कल्याण देवळाणकर,** सेवा निवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ







## शरीरासाठी बी ६ जीवनसत्त्व का आहे गरजेचे?

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

शरीराच्या विकासासाठी अनेक प्रकारच्या जीवनसत्त्वांची आवश्यकता असते. बी ६ जीवनसत्त्वही ) त्यापैकीच एक. बी ६ हे जीवनसत्त्व पायरिडॉक्साईन नावाने ओळखले जाते. बी कॉम्प्लेक्स या जीवनसत्त्वाचा हा एक भाग असतो. बी १२ या जीवनसत्त्वाचाही तो एक भाग असल्यामुळे गर्भवती महिलांना त्यांच्या गर्भाच्या वाढीसाठी गरजेचे असते. त्याशिवाय बी ६ जीवनसत्त्वामुळे हृदयविकार दूर ठेवतो आणि मेंदूच्या विकासास मदत होते. या जीवनसत्त्वामुळे खाल्लेल्या अन्नाचे ऊर्जेत रूपांतर होते.

तसेच, आहारातील चरबी, प्रथिने यांचे पचन होण्यासही मदत करते. केस, त्वचा, यकृत आणि डोळ्यांच्या आरोग्यासाठीही बी जीवनसत्त्व अत्यंत महत्त्वाचे असते. बी जीवनसत्त्वांच्या आठ घटकांपैकी पायरिडॉक्साईन हा एक महत्त्वाचा घटक आहे. पायरोडॉक्सल ५ फॉस्फेट -पीएलपी हे व्हिटॅमिन बी ६ चे मुख्य रूप आणि कोएन्झाइम आहे. हे पीएलपी शंभरहून अधिक एन्झाईम्सना त्यांच्या कामात मदत करते. व्हिटॅमिन बी ६ प्रतिकारशक्ती कायम राखण्यासही मदत करते. अलीकडील अभ्यासात असेही आढळून आले आहे की, व्हिटॅमिन बी ६ कर्करोगाचा धोका कमी करण्यासही महत्त्वाचे ठरते.

रोगप्रतिकारकशक्ती वाढवणार्या मज्जासंस्थेचे कार्य नीट चालावे, यासाठी हे जीवनसत्त्व गरजेचे असते. त्यामुळे संधिवातासारखे आजार दूर राहू शकतात. विविध प्रकारे होणारे संसर्ग टाळण्यासाठी शरीरातील रोगप्रतिकारकशक्ती काम करत असते. बी ६ हे जीवनसत्त्व त्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे रोग आपल्यापासून दूर राहतात. या जीवनसत्त्वामुळे आहारातील पोषक मूल्यांचे योग्य प्रकारे शरीरावश्यक ऊर्जेत रूपांतर केले जाते.




बर्याच स्त्रियांना मासिक पाळी येण्यापूर्वी ओटीपोटात दुखणे, कंबर दुखणे आदी त्रास जाणवतात. ही लक्षणे कमी करण्यामध्ये बी ६ जीवनसत्त्व फायदेशीर ठरते. या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे मानसिक अस्वस्थता येऊ शकते. हार्मोन्स आणि त्याची पातळी यांच्यातील तोल यामुळे सांभाळला जातो. हार्मोन्सचा असमतोल मानसिक अस्वस्थता आणणारा असतो. बी ६ जीवनसत्त्वामुळे त्वचेचे आरोग्य चांगले राहते. कारण त्वचेच्या विविध आजारांशी सामना करण्यात बी ६ जीवनसत्त्व उपयोगी पडते. इसब, कोंडा, मुरुम, केस गळणे आणि कोरडी त्वचा तसेच सोरायसिस आणि मेलानोमासारख्या त्वचारोगात या जीवनसत्त्वाचा फायदा जास्त होतो.

# अकोल्यात भरणार पाच दिवसांची 'वऱ्हाडी जत्रा'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अकोला-** व-हाडची संस्कृती, खाद्यपदार्थ, ग्रामजीवन यांचे दर्शन घडविणारी 'व-हाडी जत्रा' अकोल्यातील शास्त्री क्रीडांगणात दि. ३१ जानेवारी ते ४ फेब्रुवारीदरम्यान भरणार आहे.

महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान 'उमेद'तर्फे 'व-हाडी जत्रा' हा मिनी सरस महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महिला स्वयंसहायता समूहांनी उत्पादित बाजारपेठ मिळवून देण्यासाठी व या समूहांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. याबाबत नियोजनासाठी बैठक जिल्हाधिका-यांच्या दालनात झाली.

ग्रामीण भागातील महिलाभगिनींनी बचत गटाच्या माध्यमांतून तयार केलेली विविध उत्पादने या माध्यमातून उपलब्ध होणार आहेत.उपक्रमाचे परिपूर्ण व वैविध्यपूर्ण नियोजन, व्यापक प्रसिद्धी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी दिले.




व-हाडी जत्रेत ग्रामीण कलाकुसर, खाद्यपदार्थ, मसाले व इतर उत्पादनांची सुमारे ८० दालने असतील. त्याशिवाय प्रत्येक सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. अकोला जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी या महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. कुंभार, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक मनोज जाधव, 'उमेद'चे जिल्हा व्यवस्थापक नरेंद्र काकड यांनी केले आहे.

# जन्म-मृत्यू नोंदीबाबतच्या तक्रारींची चौकशी 'एसआयटी' करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अकोला-** उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र नोंदीबाबत राज्य शासनाकडे विविध जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत आहेत. या तक्रारींची चौकशी गृह विभागामार्फत विशेष तपासणी पथकाद्वारे (एसआयटी) करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनातर्फे देण्यात आली.

जन्म मृत्यू नोंदणी कायदा, १९६९ मध्ये सुधारणा करून उशिरा जन्म व मृत्यू नोंदणी संबंधीचे अधिकार हे जिल्हाधिकारी/ उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. गृह विभाग अधिसूचना दि. १० सप्टेंबर २०२३ नुसार अकोला जिल्ह्यात उशिरा जन्म व मृत्यू नोंदणीचे अधिकार तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांना प्रदान करण्यात आले.

उशिरा जन्म- मृत्यू नोंदणीबाबत जिल्ह्यात १५ हजार ८४५ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १० हजार २७३ प्रमाणपत्र देण्यात आले असून, १०७ नामंजूर व ४ हजार ८४४ प्रलंबित आहेत. तथापि, कायद्यातील सुधारणेनंतर झालेल्या कार्यवाहीसंदर्भात शासनाला मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या.

या तक्रारींची चौकशी गृह विभागामार्फत विशेष तपासणी पथकाद्वारे करण्यात येणार आहे. तसे पत्र शासनाकडून सर्व जिल्ह्यांना प्राप्त झाले आहे.

कायद्यातील सुधारणेनुसार उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र वितरित करण्याची कार्यवाही पुढील आदेशापर्यंत करू नये, असेही आदेश शासनाने दिले आहेत.

# जिल्ह्यात ३१ जानेवारीपासून कुष्ठरुग्ण शोध अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती-** राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत जिल्ह्यात दि. ३१ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२५ दरम्यान कुष्ठरुग्ण शोध अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानाच्या नियोजनाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय समन्वय समितीची सभा पार पडली.मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी कुष्ठरुग्ण शोध अभियानामध्ये आशा कर्मचारी व पुरुष स्वयंसेवकांनी घरांना भेटी देवून सर्व सदस्यांची कुष्ठरोगाबाबत तपासणी करावी. तसेच इतर शिक्षण, समाजकल्याण, स्वयंसेवी संस्था, परिवहन, लायंस क्लब, रोटरी क्लब यांनी कार्यक्रमास सहकार्य करण्याचे आवाहन केले. सभेसाठी सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. पूनम मोहोकार, अतिरीक्त जिल्हा शल्य चिकीत्सक, डॉ. संदिप हेडावू, अतिरीक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण पारीसे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. शरद जोगी, वैद्यकीय अधिकारी डॉ. विनंती नवरे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. जुबेर अली, कोठारा लेप्रसी हॉस्पीटलचे मिलींद चांदेकर, तपोवनचे सचिव सहदेव गोळे, स्वयंसेवी संस्था निंभोराच्या रेन्सी फान्सीस, समाज कल्याण विभागाचे श्री. शाह, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार दासरवाड, लायन्स क्लबचे रविंद्र उघडे, बबन वैराळे, रोटरी इंद्रपुरीचे पवन लड्ढा आदी उपस्थित होते.डॉ. पूनम मोहोकार यांनी प्रास्ताविक केले. पन्हाळे यांनी आभार मानले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ — शहर/ग्रामिण


# प्रजासत्ताक दिनी वाहतूक व्यवस्थेत बदल

## नागरिकांनी नोंद घेण्याचे आवाहन




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती–** प्रजासत्ताक दिनाच्या ७६व्या वर्धापन दिनानिमित्त रविवार, दि. २६ जानेवारी २०२५ रोजी असून विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहे. यानिमित्ताने शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेतील लहान मुले, पालक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्या वाहनांची रस्त्यावर फार वर्दळ असणार आहे. यामुळे वाहतुकीची कोंडी होऊन अपघातासारखा अनुचित प्रकार घडू नये तसेच सार्वजनिक शांतता भंग होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी वाहतूक व्यवस्थेत अंशत: बदल करण्यात आले आहेत.

रविवारी, सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत शहरातील रस्ते सर्व प्रकारच्या वाहनासाठी बंद राहतील. त्यात मालवाहू, हलकी व जडवाहने यांना शहरात सर्व बाजूने प्रवेश बंद राहील.

शहरातील उड्डाणपूल, गाडगेनगर, समाधी मंदीरापासून ते जिल्हा स्टेडियम येथील उड्डाणपूल, इर्विन चौक ते राजापेठ पोलीस स्टेशन, कुथे हॉस्पीटल ते नंदा मार्केट व कुशल ऑटोकडे जाणाऱ्या उड्डाण पुलावरून दि. २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनाना प्रवेश बंदी राहणार आहे. याची नोंद नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांनी केले आहे.विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून शहरातील सर्व हलक्या व जड वाहनांची वाहतूक नियंत्रित करण्यासाठी पोलीस उपायुक्त यांनी मुंबई पोलीस कायदा १९५१चे कलम ३३ (१) (ब), तसेच मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ नुसार आदेश निर्गमीत केला आहे.

# इयत्ता दहावीच्या परीक्षार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र

## प्रवेशपत्र (हॉल टिकिट) मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती. –** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे व्दारे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२५ साठी बसलेल्या सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (हॉल टिकीट) मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. डमीट कार्ड या लिंकवर क्लिक करुन प्रवेशपत्रे प्राप्त करून घेता येईल, याची संबंधित शाळांच्या मुख्याध्यापक, विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे मंडळाव्दारे आवाहन करण्यात आले आहे.

सर्व माध्यमिक शाळांना फेब्रुवारी मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (हॉल टिकीट) ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या www. mahahsscboard.in या संकेतस्थळावर सोमवार दि. २० जानेवारी, २०२५ पासून डमिट कार्ड या लिंक व्दारे डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा. तसेच ऑनलाईन प्रवेशपत्रे (हॉल टिकीट) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, फेब्रुवारी,मार्च २०२५ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळानी इ.१० वी. परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.



प्रवेशपत्र (हॉल टिकीट) ऑनलाईन पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये, सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक यांचा शिक्षा उमटवून स्वाक्षरी करावी. ज्या आवेदनपत्रांना पेड असे Status प्राप्त झालेले आहे. त्यांचीच प्रवेशपत्रे Paid Status -dmit Card या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व ऍीर डशरीं छे विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे ऍीर डशरीं छे –वाळीं उरीव या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

ऑनलाईन केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/जन्मतारीख/जन्मठिकाण अशा दुरुस्त्या असल्यास सदर दुरुस्त्या ऑनलाईन पध्दतीने करावयाच्या असून त्याकरीता -pplication Correction ही Link उपलब्ध करून देण्यात आलेली असून विहित दुरुस्ती शुल्क भरून दुरुस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर Correction -dmit Card `m Link व्दारे सुधारीत –वाळीं उरीव उपलब्ध होतील. विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरुस्त्या करण्यात याव्यात. ज्या आवेदनपत्रांना झरळव असे Status प्राप्त झालेले नाही, अशा आनेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे Status Update hmodyZ Late Paid Status -dmit Card या Option व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील. फोटो सदोष असल्यास, त्यावर विद्यार्थ्यांचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित माध्यमिक शाळानी पुनःश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे. तरी फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी.) परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक तसेच सर्व माध्यमिक शाळा यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी, असे अमरावती विभागीय मंडळाच्या विभागीय सचिव निलिमा टाके यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# गणराज्य दिन संचलनाचे विदर्भातील ५१ जण होणार साक्षीदार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३नागपूर :–** गणराज्य दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्य पथ होणाऱ्या संचलनाचे (परेड) साक्षीदार होण्यासाठी विदर्भातील ५१ जणांना संधी मिळणार आहे. त्यांना केंद्र सरकारतर्फे विशेष निमंत्रण देण्यात आले आहे.

राष्ट्रीय महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये लोकसहभाग वाढावा म्हणून २६ जानेवारी रोजी नवी दिल्लीतील कर्तव्य पथावर ७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या परेड पाहण्यासाठी देशभरातील १० हजार विशेष पाहुण्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणारे आणि सरकारी योजनांचा उत्तम वापर करणाऱ्यांना निमंत्रण देण्यात आले आहे. विशेष अतिथी म्हणून गावातील सरपंच, आपत्ती निवारण कर्मचारी, आदर्श गावातील लोक, प्राथमिक कृषी पतपुरवठा (पीएसी) सोसायट्या, वन व वन्यजीव संवर्धन स्वयंसेवक व कामगार, हातमाग कारागीर, विविध योजनांचे आदिवासी लाभार्थी, पॅरालिम्पिक पथक व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे विजेते, शेतकरी, अंगणवाडी सेविका, रस्ते बांधणी कामगार



यांचा समावेश आहे. शभरातील दहा हजार विशेष पाहुण्यांमध्ये महाराष्ट्रातील २२५ विशेष पाहुण्यांचा समावेश आहे. विदर्भातून ५१ पाहुण्यांना निमंत्रण मिळाले आहे. यामध्ये नागपुरातील ईश्वरी दत्तात्रय कोल्हे, देजास्वार्तिनी एस. एम. आणि भंडारा येथील पलाश इलमकर (पंतप्रधान यशस्वी योजना), यवतमाळ येथील रजनी अविनाश शिर्के (राष्ट्रीय पुरस्कार विजेते) (महाराष्ट्र टेक्सटाईल, हस्तकला), गडचिरोली येथील वर्षा ताताजी सातपुते, वाशिम येथील सिंधू रामचंद्र रोडगे (महाराष्ट्र महिला व बालविकास गटात, हस्तकला) यांचा समावेश आहे.

आपापल्या खेळातील कामगिरीने देशाचे नाव उंचावलेल्या खेळाडूंना निमंत्रण देण्यात आले आहे. पॅरा ऑलिंपिक पथकातील सदस्य, बुद्धिबळ ऑलिम्पियाड पदक विजेते, ब्रिज वर्ल्ड गेम्स रौप्यपदक विजेते आणि स्नूकर वर्ल्ड चॅम्पियनशिप गोल्ड मेडलिस्ट यांना विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे.नवउपक्रम आणि उद्योजकता भावनेला प्रोत्साहन देत पेटंटधारक आणि स्टार्ट–अप्सना विशेष अतिथी म्हणून सहभागी करून घेण्यात आले आहे. अखिल भारतीय शालेय बँड स्पर्धा व वीर गाथा स्पर्धेचे विजेते ठरलेले देशभक्तीपर उत्साही शालेय विद्यार्थीही प्रजासत्ताक दिन सोहळ्याला विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## अचलपूर येथील ढेपे दाम्पत्य पूजासत्ताक दिनी विशेष पाहुणे म्हणून निमंत्रित



जल शक्ती मंत्रालय, नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त कर्तव्यपथ, दिल्ली येथील सोहळ्याकरिता २३ ते २६ जानेवारीदरम्यान उत्तम कार्य केलेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या सदस्यांना विशेष पाहुणे म्हणुन निमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये जिल्हयातील हनवतखेडा ग्रामपंचायतने (ता. अचलपूर) जल जिवन मिशन योजनेत उत्कृष्ट कार्य करुन आपल्या गावास जलसमृध्द तर केलेच शिवाय प्रत्येक घराला नळ कनेक्शन देऊन गाव हर घर जल म्हणून घोषीत केले आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान व्हावा म्हणून केंद्र शासनाने सरपंच विजय ढेपे व त्याच्या पत्नी जयश्री ढेपे यांना प्रजासत्ताक दिन सोहळ्यास विशेष पाहुणे म्हणून आमंत्रीत केले.

# आम्हाला माफ करा, चूक झाली..!

## रेट्याखेडा अंधश्रद्धा प्रकरणी गावकऱ्यांनी मागितली माफी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३रेट्याखेडा (चिखलदरा) :** गावात घडलेली घटना निंदनीय आहे. अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन आमच्याकडून चूक झाली आहे. आम्हाला माफ करा. यानंतर असे होणार नाही. आम्ही झालेल्या घटनेबद्दल खेद व्यक्त करतो. म्हाताऱ्या आजीचा औषधोपचार करू. कुठल्याच प्रकारचा द्वेषभाव न ठेवता आम्ही सर्व गावकरी एकोप्याने, एका कुटुंबाप्रमाणे राहू, या शपथेसह संपूर्ण गावकऱ्यांनी शेलूकर कुटुंबाची पाया पडून माफी मागितली.




**दवंडीवर आले गावकरी**

मागील चार दिवसांपासून दहशतीखाली असलेल्या रेट्याखेडा गावात पोलिसांच्या चकरा वाढल्या. परिणामी भीतीपोटी गावकरी गावाबाहेर निघून गेले होते. गावसभा ठरविल्यानंतर मंगळवारी दुपारी २ वाजता काही प्रमाणात त्यांनी उपस्थिती दर्शविली. गावातीलच एका झाडाखाली ही सभा भरली.

# प्रजासत्ताक दिनाची तयारी जोरात; परेडची तालिम शिस्तीत



विभागीय क्रीडा संकुलातील पं. नेहरू जिल्हा स्टेडियमवर यंदा रविवार, २६ जानेवारीला सकाळी ८.३० वाजता प्रजासत्ताक दिन साजरा केला जाणार आहे. यानिमित्त आतापासूनच परेडची तयारी उत्साहात सुरू आहे. सकाळी व सायंकाळी येथे आरपीआय श्रीधर गुळसुंदरे यांच्या मार्गदर्शनात राज्य राखीव पोलिस दल, शहर पोलिस, ग्रामीण पोलिस, वाहतूक पोलिस, होमगार्ड, स्काऊट गाइड, एनसीसीचे प्लाटून शिस्तीत परेडची तयारी करत आहेत. एकूण प्लाटून १२ एकूण अधिकारी ०८प्रत्येक प्लाटूनमधील व्यक्तींची संख्या ३०

# विद्यार्थ्यांनी अभ्यासले ड्रोन व फोटो पत्रकारितेचे तंत्र

## आयआयएमसीत कार्यशाळा : तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती–** ड्रोन व कॅमेराच्या तांत्रिक बाबी समजून आधुनिक पत्रकारितेसाठी या तंत्राचा प्रभावी वापर करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांनी आयआयएमसीत आयोजित कार्यशाळेत आत्मसात केले. यावेळी विद्यार्थ्यांनी बातमीसाठी कॅमेराने फोटो काढणे, कॅमेराचे विविध अँगल, ड्रोन हवेत उडविणे आणि त्याद्वारे छायाचित्रण व शूटिंग करणे, आकाशातून मोठ्या भूभागाचे चित्रण करणे इत्यादी बाबींचा प्रात्यक्षिकासह सराव केला. भारतीय जन संचार संस्थानच्या (आयआयएमसी) पश्चिम क्षेत्रीय परिसरात 'ड्रोन व फोटो पत्रकारिता' या विषयावर दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात लोकमत मीडिया ग्रुपचे छायाचित्रकार मनीष तसरे आणि शहरातील ड्रोन तज्ज्ञ हितेश बोधानी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा, डॉ. विनोद निताळे, डॉ. आदित्य मिश्रा, चैतन्य पाटील, जयंत सोनोने, निकिता वाघ उपस्थित होते. ड्रोन व कॅमेरा आधुनिक पत्रकारितेचे अंग बनले आहे. घटनेचे चित्रण करून बातमीच्या स्वरुपात ते देण्यासाठी ड्रोन व कॅमेरा हाताळणीचे तंत्र पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना आत्मसात व्हावे यासाठी आयआयएमसीत विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात



आले होते. यात विद्यार्थ्यांनी ड्रोन व कॅमेरा हाताळण्याचे कौशल्य तज्ज्ञांच्या मार्गदर्शनात आत्मसात केले. कार्यशाळेत प्रथम सत्रात हितेश बोधानी यांनी ड्रोन हाताळणीचे तंत्र विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकच्या माध्यमातून समजावून संगितले. विद्यार्थ्यांनी ड्रोनचे तंत्रज्ञान समजून घेत ड्रोन हवेत उडविण्याचे आणि त्याद्वारे छायाचित्र व रेकॉर्डिंग करण्याचे कौशल्य आत्मसात केले. दुसर्या सत्रात मनीष तसरे यांनी कॅमेरा हाताळणीचे तंत्र विस्ताराने समजावून सांगितले. बातमीच्या अनुषंगाने फोटो कसा काढावा, त्याचे संपादन करताना कशी दक्षता घ्यावी त्याच बरोबर कॅमेराच्या तांत्रिक बाजू आदी विषयी मार्गदर्शन केले. यावेळी मनीष तसरे यांनी निवडक छायाचित्रांच्या माध्यमातून बातमी लेखनाचे तंत्र उलगडून संगितले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी ड्रोन द्वारा स्वतः काढलेल्या छायाचित्रांचे आणि व्हिडीओचे सादरीकरण शेवटी केले.कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी राजेश झोलेकर, संजय पाखोडे, नुरूझुमा शेख, भूषण मोहोकार, राजेश कुमार अनंत नांदुरकर, मंदा पवार, नंदा तुप्पट आदींचे सहकार्य लाभले. कार्यशाळेत मराठी, हिंदी आणि इंग्रजी पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्याथ संख्येने उपस्थित होते.

# ग्राहकांना अचूक वीज बिल मिळण्यासाठी जिल्ह्यात महावितरणकडून सदोष मीटर बदलण्याच्या मोहीमेला गती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती–** महावितरणने जिल्ह्यातील सदोष वीज मीटर बदलण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. ग्राहकांच्या वीज बिल विषयक अडचणी दूर करण्यासाठी आणि अचूक बिलिंग सुनिश्चित करण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे.

जिल्ह्यात डिसेंबर महिना अखेर एकुण ७६ हजार ७०४ ग्राहकाचे मीटर सदोष असल्याचे आढळले आहे. सदोष मिटरची संख्या एकूण ग्राहकांच्या सुमारे दहा टक्क्यापर्यंत आहे. त्यामुळे या ग्राहकांना त्यांच्या वापराच्या सरासरीनुसार विजेचे बिल देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचे किंवा महावितरणचे आर्थीक नुकसान होण्याची शक्यता असल्यानेग्राहकांना अचूक बिल देण्यासंदर्भात महावितरण आग्रही असून सदोष मीटर प्राधान्याने बदलविण्याचे महावितरणने धोरण आखले आहे.

विद्युत कायदा २००३ अंतर्गत विद्युत पुरवठा संहिता –२०२१ अनुसार वीज ग्राहकांना त्याच्या विजेच्या वापरानुसार अचूक विजेचे बिल देणे वीज पुरवठा करणाऱ्या संस्थेला बंधनकारक आहे. त्यामुळे सदोष मिटर बदलविण्यासंदर्भात महावितरणला प्राप्त झालेल्या ग्राहकांच्या तक्रारीनुसार/ माहितीनुसार जिल्ह्यात सदोष मिटर बदलविण्याला गती देण्यात आली आहे.



सध्या बदलविण्यात येत असलेले मीटर हे केवळ डिजीटल मीटर असून त्यामध्ये वीज देयकासंबंधीची कोणतीही तरतूद प्रीपेड/पोस्टपेड उपलब्ध नाही.तथापि या डीजीटल मीटरचे मोबाईल प लवकरच ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात येणार असून त्यानंतर ग्राहकाला त्याच्या दैनंदीन वीज वापराची माहिती मोबाईलवर मिळणे शक्य होईल.

विज्ञानाने केलेल्या तांत्रिक प्रगतीमुळे सर्वच क्षेत्रात विशेषत : ग्राहक सेवा क्षेत्रामध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाशी सुसंगत बदल झाले आहेत. याला महावितरणही अपवाद नाही. प्रामाणिकपणे वीजबिल भरणाऱ्या वीज ग्राहकांना त्यांच्या वापरानुसारच अचूक वीजबिल देण्याचा महावितरणचा कायम प्रयत्न राहीला आहे. त्यासाठी तंत्रज्ञानातील बदलानुसार ग्राहक हित लक्षात घेऊन शक्य तेथे मानवी हस्तक्षेप विरहीत प्रणाली आस्थापित करण्याचा महावितरणचा प्रयत्न राहीला आहे.

महावितरणच्या प्रणालीतील वीज मीटर हा विषय घेतला तर तंत्रज्ञानानुसार खालील प्रमाणे बदल झालेले दिसून येतील. सुरवातीला महावितरणकडे ईलेक्ट्रोमेकॅनिकल मीटर (फिरणारी डिस्क) होते.त्यानंतर स्टॅटीक मीटर (आधी मेकॅनिकल काउंटर, त्यानंतर डिजिटल डिस्प्ले) आणि आता रिमोटच्या सहाय्याने मीटर रिडींग घेता येऊ शकतील असे आर.एफ.मीटर लावण्यात आले. त्यामुळे सध्या बदलविण्यात येत असलेले डिजीटल मीटर हे मानवी हस्तक्षेप टाळण्याच्या दृष्टीने विकसीत करण्यात आलेले आधुनिक मीटर आहेत. त्यामुळे वीज ग्राहकांना दैनंदिन वीज वापराची माहिती मोबाईलवर उपलब्ध होणार असल्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा फायदाच होणार आहे.–

# राज्य मार्ग परिवहन महामंडळ बस मध्ये पूर्ण तिकीट स्टॅण्डअप तर अर्धी तिकीट फुकट वाले शिटडावून

## प्रत्येक बसस्थानकात बस ची संख्या वाढवणे काळाची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नेरपिंगळाई.–** अनेक वेळी बस मध्ये चिक्कार गर्दी राहत असुन शासन अर्धी तिकीट ,मोफत तिकीट योजना राबवत असल्याने पूर्ण तिकिट स्टॅण्डप अर्धी तिकिट सीटडाऊन ही परिस्थिती बघायला मिळतात अमरावती जिल्ह्यात मोर्शी तालुक्यात दररोज परिवहन मंडळाच्या अनेक बस चालतात त्यात शासनाने प्रवाश्याकरीता लाडक्या बहिणी करीता अर्धी तिकीट तर ६५ वर्षे वया करीता अर्धी तिकीट व ७५ वया वरील व्यक्तींकरिता मोफत तिकिट अश्या वेगळ्या पद्धती सुरू केल्यानी लालपरी मध्ये चिक्कार गर्दी राहत असल्याने या योजनांचे फायदे घेणार्यांची आसणान वर



आपली सीट पक्की करत असल्याने बस मध्ये ज्याना पूर्ण तिकिट काढावी लागते जे या योजना मध्ये बसत नाही त्यांना जागा मिळत नसल्याने ते बरेच किलोमिटरचे प्रवास उभे राहून करतात म्हणुन पूर्ण तिकिट स्टँडप अर्धी तिकिट व मोफत तिकीट सीटडाऊन अस वातावरण परिवहन महामंडळाच्या बसमध्ये बघायला मिळतात म्हणून बसची संख्या वाढणे काळाची गरज आहे म्हणून परिवहन विभागणी याची दखल घ्यावी अशी मागणी जनता करत आहे बस ची संख्या वाढविण्याकरीता संपूर्ण लोकप्रतीनिधीनी लक्ष्य केंद्रीत करावे अशी मागणी प्रवाशी करत आहे.

# शिक्षकांची थकबाकी प्रकरणे निकाली काढा

## 'टीचर्स फ्रंट' चे शिक्षण उपसंचालकांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती :** वेतन पथकाकडे सादर करण्यात येत असलेली शिक्षकांची थकबाकी देयके नियमित महिनेवारी पध्दतीने स्वीकारून तातडीने निकाली काढावीत, अशी मागणी करणारे निवेदन 'टीचर्स डेमोक्रॅटीक फ्रंट'चे निमंत्रक डॉ. प्रशांत विघे यांच्या नेतृत्वात नीलिमा टाके, शिक्षण उपसंचालक यांना देण्यात आले. शिक्षण विभागाच्या, वेतन व चालू आर्थिक वर्षामध्ये दोन ते तीन वेळेस, थकबाकी देयके, अर्जित रजा देयके, ऑनलाईन प्रणालिव्दारे बदली /पदोन्नती/ वरिष्ठ निवड कालबध्द इ. कारणाने, थकीत असलेली देयके, वैद्यकिय प्रतिपूर्ती देयके मागविण्यात येत असतात. तशाप्रकारचे आदेश अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, अमरावती यांचे सहीने पारित होत असतात. मात्र, त्यामुळे वर्षभरातील वेतन देयके मोठ्या प्रमाणात संग्रहित होतात व ते नंतर तुंबतात. त्यामध्ये दुर्गम भागात कार्यरत शाळांना सदर सुचनांची माहिती होईस्तोवर तारखा निघून जातात. त्यामुळे पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे चालू आर्थिक सत्रापासून सर्व नियमित देयके १ ते ५ तारखेच्या दरम्यान स्विकारण्यात यावीत व देयके २५ ते ३० या तारखांमध्ये स्वीकारण्यात यावीत. असे निवेदन देण्यात आले आहे.–

# प्रहार अपंग क्रांती आंदोलनच्या वतीने निवेदनातून जिल्हाधिकार्यांना इशारा

## दिव्यांगांच्या प्रश्नांसाठी २६ ला आंदोलन

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२३अमरावती–** विकयांग बांधवांच्या विविध प्रश्नावर शासन प्रशासन गंभीर नाही. आजही अनेक प्रश्न शासन स्तरावर प्रलंबित आहेत. मात्र शासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप प्रहार जनशक्ती पक्ष अपंग क्रांती आंदोलनाने केला आहे. त्यामुळे २६ जानेवारी दिनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आंदोलन करण्याचा इशारा प्रहार अपंग क्रांती आंदोलनाने जिल्हाधिकार्यांना निवेदनातून दिला. दिव्यांगांना संजय गांधी निराधार योजना अनुदान ६ हजार रुपये महिना तातडीने लागू करावे.



अनुदान ५ तारखेच्या आत देण्यात यावे. उत्पन्नाची अट ही दीड लाखांची करावी, मुले २१ वर्षाची झाल्यानंतर अनुदान बंद करू नये. शासकीय जागा उपलब्ध करून विनाअट घरकूल द्यावे. अंत्योदयचा लाभ द्यावा. जिल्ह्यातील दिव्यांगांना व्यवसाय करण्यासाठी शासन निर्णयाप्रमाणे दोनशे स्केअर फूट जागा द्यावी.अपंग वित्त विकास महामंडळाकडून वितरीत केलेले कर्ज माफ करावे.

जिल्ह्यात स्वयंरोजगारासाठी स्टॉल देण्याचे धोरण आखून स्टॉलचे वाटप करावे. दिव्यांगांचे खोटे प्रमाणपत्र आढळल्यास त्यांच्यावर कार्यवाही करावी. केंद्र शासनाचा दिव्यांग कायदा २०१६ कलम ९२ मधील तरतुदीची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी, जिल्ह्यातील सर्व पोलिस आयुक्त व पोलिस स्टेशनला कळवावे, राजकीय आरक्षण देण्यात यावे.

### दिव्यांग विद्यापीठाची जिल्ह्यात स्थापना करावी

जिल्ह्यात दिव्यांग विद्यापीठाची स्थापना करावी, दिव्यांग कल्याण विभाग स्थापन केलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर विभागाकरिता २ हजार ६३ पदे भरावी. यासह अन्य मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. या वेळी चंदू खेडकर, श्याम राजपूत आदी उपस्थित होते.

# शेतकरी आत्महत्या ग्रस्त प्रकाश पोटे याच्या कुटुंबाला यशोमती ठाकूर यांनी दिली भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नेरपिंगळाई–** येथील कर्ज बाजारी शेतकरी प्रकाश पोटे यांनी राहत्या घरात अतम्हत्या केली. त्यांच्या कुटुंबाला आमदार यशोमती ताई ठाकूर यांनी भेट देऊन पोटे कुटुंबा चें अश्रू पुसले सढळ हातांनी केली मदतनेरपिंगलाई येथील आल्पभूधारक कर्जबाजारी शेतकरी प्रकाश पोटे याच्या वर ट्रॅक्टर व उसनवारी. आणि शेतीवर मोठया प्रमाणात कर्ज असल्यानी त्यात हि तिन ऐककर शेतीत सतत नापीकी नी चिंताग्रस्त झाल्याने प्रकाश पोटे यांनी राहत्या घरात गळफास लाऊन आत्महत्या केली शेतकरी अत्यहत्या झाल्यावरही त्यांच्या कडे कुणीच भेट देने उचित समजले नाही अश्यातच ही महिती लोकप्रिय माजी आमदार यशोमती ताई ठाकूर यांना



मिळताच त्यांनी प्रकाश पोटे यांच्या कुटुंबाला भेट दिली. परिवारातील सदस्यांनी आपल्या अश्रूरुपी भावना व्यक करत यशोमती ताई ठाकूर यांच्या कडे भावना व्यक्त करत शासन मदती ची मागणी केली ताई सर्वप्रथम भेट देउन पोटे कुटुंबाला सढल हातानी मदत केली या वेळी कॉंग्रश चे तालुका अध्यक्ष रमेश काळे.. राजू काका ठाकूर.डॉक्टर धनजय तट्टे. साजिद पठान. खल्लील भाई सतीश इंगले. अतुल खोडस्कर पवन काळमेघ संजय मोहॉकर अल्पजा बडासे. रमाताई इंगळे सविता खोडसकर व सर्व कॉंगेस कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

# दिशा आय फाउंडेशन च्या वतीने सर्व मनपाच्या शाळेत मोफत डोळे तपासणी अभियानाची सुरवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

अमरावती महागर पालिकेच्या अंतर्गत येत असलेल्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा मध्ये विद्यार्थी – विद्यार्थिनीच्या सार्वजनिक आरोग्य विभाग महानगर पालिका तसेच दिशा आय फाउंडेशन च्या संयुक्त विद्यमाने भाजी बाजार मधील मनपा शाळा क्रमांक ११ व ६ येथून सुरवात करण्यात आली ह्या कार्यक्रमाचे उद्घाटन आरोग्य



अधिकारी डॉ विशाल काळे यांनी केले तसेच दिशा आय फाउंडेशन चे अध्यक्ष डॉ स्वप्नील गावंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले ह्या डोळे तपासणी अभियाना मध्ये मनपा चे सर्व शाळेत दर आठवड्यात विद्यार्थ्यांचे ची डोळे तपासणी करून योग्य वैद्यकीय मार्गदर्शन मोफत देण्यात येईल असे डॉ विशाल काळे यांनी सांगितले व विद्यार्थ्याच्या पालकांनी दिलेल्या मार्गदर्शनाचा सहकार्य करून डोळे तपासणी करावी असे डॉ स्वप्नील गावंडे यांनी सांगितले हंगामी स्वरूपात डोळ्यांचे आजार येत असतात त्या मध्ये डोळे लाल होणे , अचानक दृष्टी कमी होणे डोळ्यातून पाणी निघणे असे काही आजार दिसल्यास त्वरित आपल्या शिक्षकांना अवगत करून देणे जने करून मनपाचे शिक्षक हे दिशा आय फाउंडेशन यांच्या शी संपर्क साधून उपचार करून देतील असे डॉ रुपेश खडसे यांनी कळविले.

# जिल्हा नियोजन समितीचा विकास आराखडा प्रतिक्षेत

## विभागस्तरावरील बैठकीकडे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती** :पालकमंत्र्यांच्या नियुक्त्या लांबल्याने जिल्ह्यासह सगळीकडेच जिल्हा नियोजन समित्यांचे (डीपीसी) नियोजन विस्कळीत झाले आहे. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाआधी दरवर्षी सर्व जिल्ह्यांच्या वार्षिक आराखड्यांचे अर्थ व नियोजन विभागासमोर सादरीकरण होते. त्यासाठी साधारणपणे १५ ते २० जानेवारीपर्यंत विभागीय स्तरावर बैठका घेतल्या जातात. मात्र पालकमंत्र्यांच्या निवडप्रक्रिया लांबल्याने सन २०२५–२६ चा नियोजन आराखडा अद्यापही अंतिम होऊ शकला नाही.विधानसभा निवडणुकीनंतर गत नोव्हेंबर महिन्यात राज्यात नवीन सरकार सत्तेवर आले. मंत्रिमंडळाचा विस्तारहीआटोपला. मात्र पालकमंत्री निवडीची प्रक्रिया विलंबाने झाली आहे. अशातच आता विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनच जवळ आले आहेत. त्यामध्ये सन २०२५–२६ या नवीन आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्पाला शिक्कामोर्तब केले जाते.

त्यामुळे जानेवारी महिन्यात जिल्ह्यांच्या जिल्हा नियोजन समितीचा वार्षिक आराखडा तयार करून तो वित्त व नियोजन विभागाकडे मांडला जातो.

### निधीची प्रतीक्षा

२०२५–२६ या आर्थिक वर्षाचे आराखडे मंजुरीसाठी वेटिंगवर आहेत. परंतु त्यासोबतच सन २०२४–२५ या चालू आर्थिक वर्षाच्या जिल्हा वार्षिक योजनांचा निधीही रखडला आहे. जिल्ह्यासाठी ३२५ कोटी रुपयांच्या निधीस शासनाने मंजुरी दिली होती. आर्थिक वर्ष संपण्यासाठी दोन–अडीच महिनेच शिल्लक राहिले आहेत. मात्र आतापर्यंत शासनाने केवळ १८९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. उर्वरित निधीची प्रतीक्षा आहे.–

# अखेर नमस्कारी गावात पोहोचली परिवहन मंडळाची बस

## ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३तिवसा** जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर,वर्धा नदी पात्राच्या किनाऱ्यावर असलेल्या नमस्कारी ग्रामस्थांचा दळणवळणासह शिक्षणाचा प्रश्न अखेर सुटला. कारण मुख्य रस्त्याच्या नूतनीकरणाचे काम नुकतेच पूर्णत्वास गेले आणि अखेर मंगळवारी राज्य परिवहन महामंडळाची बसफेरी नमस्कारी गावात दाखल झाली.

गेल्या कित्येक वर्षापासून नमस्कारी गाव हे पुनर्वसित असल्याने गाव विकासापासून कोसोदूर होते. ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांना अनेक हालअपेष्टा सहन करून जीवघेण्या समस्यांचा सामना करावा लागत होता.ही बाब तिवसा पंचायत समितीच्या उपसभापती रोशनजिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर,वर्धा नदी पात्राच्या किनाऱ्यावर असलेल्या नमस्कारी ग्रामस्थांचा दळणवळणासह शिक्षणाचा प्रश्न अखेर सुटला. कारण मुख्य रस्त्याच्या नूतनीकरणाचे काम नुकतेच पूर्णत्वास गेले आणि अखेर मंगळवारी राज्य परिवहन महामंडळाची बसफेरी नमस्कारी गावात दाखल झाली.



गेल्या कित्येक वर्षापासून नमस्कारी गाव हे पुनर्वसित असल्याने गाव विकासापासून कोसोदूर होते. ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांना अनेक हालअपेष्टा सहन करून जीवघेण्या समस्यांचा सामना करावा लागत होता. ही बाब तिवसा पंचायत समितीच्या उपसभापती रोशनपुनसे, तालुका युवक कॉंग्रेसचे उपाध्यक्ष मुकुंद पुनसे यांनी गांभीर्याने घेत तत्कालीन आमदार ॲड. यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे यांच्यामार्फत प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून गावाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता शर्थीचे प्रयत्न सुरू केले. सततच्या पाठपुराव्यामुळे नमस्कारी गावातील दळणवळणाच्या मुख्य रस्त्याचे नूतनीकरणाचे काम पूर्णत्वास गेले. – त्यापाठोपाठ गावात महामंडळाची बस पोहोचल्याने गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला.–

# बहिरममध्ये पोलिसांची युवकाला जबर मारहाण

## पोलिस अधीक्षकांना तक्रार, मारहाण करणाऱ्या चौघांवर कारवाई करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ बहीरम–** बहिरम येथे मित्रांसोबत रोडगे कार्यक्रमा नंतर शंकरपट पाहत असताना आपण व्यासपीठाजवळ गेलो. तेथे ५० जण असताना मलाच पोलिसांनी हटकले. बाहेर जायला निघालो तेव्हा दोन दंडुके मारले. मारू नका म्हटल्यावर पोलिसांनी बाहेर नेऊन बेदम मारहाण केली, अशी तक्रार चांदूरबाजार तालुक्यातील बेलखेडा येथील संजय बाबूराव ठाकरे (३२) या युवकाने जिल्हा ग्रामीण पोलिसअधीक्षकांना ही तक्रार दिली आहे. चारही पोलिसांवर कारवाईची मागणी या युवकाने



केली.संजय ठाकरे, विलास इंगळे, अमोल ठाकरे, अविनाश ठाकरे यांनी मंगळवारी सायंकाळी ४ वाजता रोडग्याचे जेवण केले. त्यानंतर जत्रा फिरायला गेले. शंकरपटाच्या व्यासपीठावर ओळखीच्या व्यक्तिला भेटण्यास ते गेले होते.

**खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी –** पोलिस चौकी गाठली तेव्हा कर्मचाऱ्यांनी घरी निघून जा, असे फर्मावले. तुझ्यावरच पोलिसांच्या कामात अडथळा केल्याचा गुन्हा दाखल करू, अशी दरडावणी त्यांनी केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

**पोलिस बेधुंद? –** संजय ठाकरे याच्या खिशातील सहा हजार रुपये पोलिसांनी हिसकले. ते चारही पोलिस कर्मचारी दारूच्या बेधुंद नशेत होते. त्यांना आपण चेहऱ्याने ओळखत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# येवदा ग्रामपंचायतीच्या सरपंच अपात्र

## पदाचा दुरुपयोग व कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३येवदा**

पदाचा दुरुपयोग तसेच कर्तव्यात कसूर करून वरिष्ठ कार्यालय व शासन निर्णयाचा अवमान केल्याप्रकरणी येवदा ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रतिभा राजेंद्र माकोडे यांना सरपंच व सदस्यपदावरून अपात्र घोषित करण्यात आले आहे. बुधवारी विभागीय आयुक्त कार्यालयाने सदरचा निर्णय दिला. या निर्णयामुळे तालुक्यात चांगलीच खळबळ उडाली आहे. याबाबत प्रदीप वडतकर व सुयोग टोबरे यांनी याचिका दाखल केली होती.

येवदा येथील गावठाण हद्दीतील १ लाख ५० हजार चौरस फुटाची खुली जागा आहे. सदरची जागा शासनाची परवानगी घेतल्याशिवाय कोणालाही हस्तांतरीत करता येत नाही. परंतु, येवदा येथील ही स्थावर मालमत्ता हस्तांतरण करण्याबाबत कोणतेही आदेश नसताना ग्रामपंचायतीने या मालमत्तेची नियमबाह्य पद्धतीने फेरफार घेऊन खासगी संस्थेला बेकायदेशीर पद्धतीने जागेचा नमुना ८-अ तयार करून दिला आणि त्य जागेची नोंद करून ताबा देखील दिला आहे. सदर स्थावर मालमत्तेची नोंद करून ताबा देण्याबाबत मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. याबाबतचे सर्व पुरावे तक्रारकर्ते प्रदीप वडतकर व सुयोग टोबरे यांनी आयुक्त कार्यालयाकडे सादर केले होते.या कागदपत्रांची पडताळणी करीत सरपंच प्रतिभा राजेंद्र माकोडे यांनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग तथा कर्तव्यात कसूर करून वरिष्ठ कार्यालय व शासन निर्णयाचा अवमान केल्याचे दिसून आल्यामुळे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ चे कलम ३९ (१) मधील तरतुदीनुसार त्यांना सरपंच तथा सदस्यपदाकरिता अपात्र घोषित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे दर्यापूर तालुक्यात चांगलीच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अर्जदार यांच्या बाजूने अॅड. अरविंद गुडधे यांनी सक्षम बाजू मांडली.

# महाराष्ट्राच्या पक्षी सूचीत पाण-तिरचिमणीची भर

## परतवाड्यातील पक्षी निरीक्षक डॉ. चित्रकार यांनी जांभळा तलावावर केली नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २३ परतवाडा**



तीर चिमणी या जातीतील प्रामुख्याने दक्षिण युरोपच्या उंच पर्वतीय प्रदेश व पूर्वेकडे आशियातील चीन मध्ये प्रजनन व अधिवास असणारी पाण-तीरचिमणी (वॉटर पिपीट) (शास्त्रीय नाव) या पक्षाची नुकतीच नववर्षाच्या सुरुवातीलाच महाराष्ट्राच्या पक्षी सूचित भर पडली.

हिवाळ्यात कमी अंतराचे स्थलांतर करणारे हे पक्षी असून भारतात या पक्षांच्या नोंदी उत्तरेतील जम्मू-कश्मीर, हरियाणा, दिल्ली व पंजाब तसेच पश्चिमेत राजस्थान व कच्छ-गुजरात तसेच उत्तराखंड व उत्तर प्रदेशात झालेल्या आहेत. मात्र महाराष्ट्र व दक्षिणेकडील राज्यात याआधी या पक्षाची नोंद झाली नव्हती. परतवाडा येथील डॉ. रणजीत चित्रकार या पक्षी निरीक्षकाने ही नोंद सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या अचलपूर तालुक्यातील 'जांभळा' तलावावर केली. आपल्या दैनदिन पक्षीनिरीक्षणा दरम्यान प्रथम दर्शनी ही महाराष्ट्रात सामान्यपणे आढळणाऱ्या तीर चिमणीच्या इतर जातीतील असावी असे त्यांना वाटले. मात्र त्यांनी घेतलेली छायाचित्रे व नोंदविलेले निरीक्षण या आधारे अमरावती येथील अनुभवी पक्षी निरीक्षक मनोज बिंड, शुभम गिरी व प्रशांत निकम यांनी हा पक्षी 'पाण तीरचिमणी'च असल्याची खातरजमा केली. उत्तरेकडील कडाक्याची थंडीमुळे कदाचित यावर्षी सातपुडा पर्वत रांगा ओलांडून पायथ्याशी असलेल्या एका छोट्या तलावावर या पक्ष्याची जोडी आली असावी असा पक्षीतज्ञाचा अंदाज आहे.या आधीही तालुक्यातील 'गोंडविहीर', 'उपातखेडा' व इतर काही जलाशयांवर दुर्मिळ पक्षांच्या नोंदी घेण्याचे कार्य डॉ. चित्रकार यांनी काम केलेले आहे. जगभरातील पक्षी निरीक्षक आपल्या नोंदी 'ई-बर्ड' या संकेतस्थळावर नोंदवितात. याआधी महाराष्ट्राच्या पक्षी सूचीमध्ये पक्षी निरीक्षकांनी '५८०' विविध जातींच्या पक्षांच्या नोंदी केलेल्या होत्या, यात अजून एकाची भर पडली. महाराष्ट्राच्या समृद्ध पक्षी सुचीत नववर्षाच्या सुरुवातीलाच एका नवीन पक्षाची नोंद मंजूर झाल्याने पक्षी निरीक्षकांनी आनंद व समाधान व्यक्त केले. महाराष्ट्र पक्षी संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत बडतकर यांनी देखील डॉ. चित्रकार यांचे या उपलब्धीबद्दल कौतुक केले.

# अंजनगाव सुर्जी बाजार समितीचे सभापती जयंत साबळे अपात्र

## जिल्हा उपनिबंधकांच्या आदेशाने सहकार क्षेत्रात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयंत गुणवंत साबळे यांना संचालक पदाकरिता अपात्र घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे आपसुकच ते सभापती पदावरून देखील अपात्र ठरले आहेत. यांचे विरोधात कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक प्रदीप गोमासे यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे याचिका दाखल केली होती. बुधवारी जिल्हा उपनिबंधक यांच्या या आदेशाने सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सभापती साबळे यांनी अभ्यास दौऱ्याकरिता तरतूद नसताना खर्च करणे, कर्मचारी महागाई भत्त्यामध्ये अनियमितता, उपविधी याचा भंग करणे, पदाचा दुरुपयोग करणे आदी विविध प्रकारचे दोष लावण्यात आले आहे. याकरिता बाजार समितीचे माजी संचालक प्रदीप गोमासे यांनी सभापती जयंत साबळे यांच्याविरुद्ध विविध आरोप करीत जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे याचिका दाखल केली होती.याप्रकरणी जिल्हा उपनिबंधकांनी सुनावणी घेऊन कागदोपत्रांची पडताळणी केली. याचा निकाल बुधवारी लागला. यामध्ये सभापती जयंत साबळे यांना समिती सदस्यपदावरून अपात्र घोषित करण्यात आले आहे. या आदेशाने सहकार क्षेत्रात चांगलीच खळबळ उडाली आहे.

# जिल्हा परिषद हायस्कूल उत्तमसरा येथे शालेय स्नेहसंम्मेलनाचे आयोजन : विविध स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३भातकुली**



इंद्रधनुष्य स्नेहसंमेलन २०२५ दिनांक २१ जानेवारी २०२५ ते २३ जानेवारी २०२५ ला जिल्हा परिषद हायस्कूल उत्तमसरा पं.स.भातकुली येथे संपन्न होत आहे. मैदानी खेळ, पाककला स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा,हस्तकला स्पर्धा,पुष्पगुच्छ स्पर्धा, प्रश्नमंजुषा, आनंद मेळावा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या तीन दिवशीय कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच धर्मेंद्र मेहरे, कार्यक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.प्रविण शेवतकर, उपसरपंच संगीता ताई मानकर, ग्रामपंचायत सदस्य शेवतकर ताई,डॉ. सोनाली देशमुख, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य तथा ग्रामपंचायत सदस्य, गावातील सन्माननीय सदस्य, शाळेची सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. उद्घाटन सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय थाटामध्ये पार पडला. शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम करून कार्यक्रम यशस्वी केला.जि.प. माध्यमिक शाळा उत्तमसरा येथील शाळेचे मुख्याध्यापक लोमेश खैरकर, संतोष कुर्हेकर,चंद्रशेखर ब्राह्मणकर,उमेश बसरे,कु.शितल भोपाळे,सौ.अश्विनी झाडे, श्रीमती. ज्योत्स्ना हायगले, श्रीमती. प्रतिभा नांदने, कुमारी प्राजक्ता भडके, भूषण बुरंगे,प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मिनाक्षी इंगळे,स.शि.गजानन येलोने,सौ.सुनिता अकर्ते,प्रमोद कांबळे यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

# जिल्ह्यातील पाणवठ्यांवर विदेशी पक्ष्यांची मांदियाळी

## हजारो किलोमीटरचा प्रवास करत अमरावतीत पोहोचले अनेक विदेशी पक्षी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**



पर्यावरण संतुलनात पक्ष्यांचे स्थलांतरण हे महत्त्वाचे असते. हिवाळ्यात विदेशातील पक्षी येथील अनेक पानवठ्यांवर आलेली दिसतात. जवळपास ६० ते ७० प्रजातींमधील नवे पक्षी हिवाळ्यात तलाव, नद्यांच्या परिसरात असल्याने पक्षी मित्रांचे लक्ष वेधून घेत आहे.

सध्या शहर, जिल्ह्यातील पाणवठ्यांवर कॉमन पोचार्ड, कॉकटेल पोचार्ड , विविध प्रजातींचे बदकं, हंस, व्हाईट स्टार्क, ग्रेटर स्कुप, , मलार्ड , लांब पाय असणारा चिखलपक्षी असे पानपक्षी, रानपक्षी दिसत आहेत. शहरालगतच्या वडाळी, छत्री तलावात बदकांच्या विविध प्रजाती पाहायला मिळतात, असे पक्षी निरीक्षक यादव तरटे यांनी सांगितले. आपल्या परिसरात युरोप, मध्य आशिया, मंगोलिया, युरेशिया येथून हे पक्षी आले आहेत. यापैकी वाईट स्टार्क हे युरोपमधून आलेत. तर मलार्ड हे पक्षी रशिया, कजाकिस्तान, मंगोलिया, सायबेरिया या देशांमधून आलेत. ग्रेटर स्कूप हा पक्षीही रशिया, कझाकिस्तान मधून आला . निसर्ग चक्रामध्ये पक्षी हे महत्त्वाची भूमिका बजावतात. भारतात नोव्हेंबर, डिसेंबर जानेवारीत विदेशातील पक्षी अन्न शोधण्यासाठी स्थलांतर करून येतात. अनेक काळांपासून या पक्ष्यांना नेमके कुठे मुक्कामी जायचे, हे माहीत असते आपल्याला हवे असणार मुबलक अन्न राहण्यासाठी योग्य वातावरण असलेल्या भागात पक्षी पोहोचतात, जिल्ह्यात पाणवठ्याच्या परिसरात सुमारे ६० ते ७० प्रजातींचे विदेशी पक्षी वास्तव्याला येतात. नोव्हेंबर, डिसेंबर ,जानेवारी फेब्रुवारी, मार्चच्या मध्यापर्यंत या पक्ष्यांचा मुक्काम पाणवठ्यांवर असतो. मार्च महिन्यात आपल्या भागात उन्हाळा सुरू होताच हे सर्व विदेशी पक्षी पुन्हा एकदा आपल्या मायदेशी परततात. ही सर्व नैसर्गिक प्रक्रिया आहे, अशी पक्षी स्थलांतारणाबाबतची माहिती पक्षी निरीक्षकांनी दिली.

पक्षी मित्रांमध्ये आनंद नेमका पक्षी कोणता, कुठून आला आणि त्याची काय वैशिष्ट्ये आहेत, याची अचूक माहिती घेणं पक्षी मित्रांसाठी आनंदाची बाब मानली जाते. सध्या विदेशातून आलेल्या पक्ष्यांचे निरीक्षण करण्यासाठी महत्त्वाचा काळ मानला जातो. अमरावती शहरालगत वडाळी तलाव, फुटका तलाव, छत्री तलाव यासह मालखेड तलाव या परिसरात मोठी दुर्बीण आणि कॅमेरा घेऊन पक्षी मित्र दिवस उजाडताच फिरताना दिसतात. मेळघाटच्या जंगलात असणारे पाणवठेही पक्षी निरीक्षणासाठी शांत आणि योग्य ठिकाण मानले जाते. सुटीच्या दिवशी तर लहान मुलांना घेऊन अनेक पक्षी मित्र जंगल परिसरात असणाऱ्या पाणवठ्यालगत अगदी ठिय्या मांडून बसलेले दिसतात.

# गुणवंत विद्यार्थ्यांमुळे होते शाळेचे नाव लौकिक- आ. राजेश वानखडे

## श्रीराम कनिष्ठ विद्यालयातील स्नेहसंमेलनात नाटिका, नृत्य, कलांचे सादरीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३टाकरखेडा संभू**



येथील श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयातील स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी नाटिका, नृत्य, कलांचे केले सादरीकरण करून पालक, प्रेक्षक, शिक्षक व प्रमुख पाहुण्यांना मंत्रमुग्ध केले. या वेळी मान्यवरांचा सत्कारही केला . शाळेतला एखादा विद्यार्थी जेव्हा मोठ्या पदावर जातो त्यावेळेस या शाळेचे व गावाच्या नावाला तो लौकिक मिळवून देत असतो, खऱ्या अर्थाने या गुणवंत विद्यार्थ्यांमुळे शाळेची ओळख होते, असे प्रतिपादन आ. राजेश वानखडे यांनी केले.

येथील श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात स्नेहसंमेलन व कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन केले होते.उद्घाटक म्हणून आ. राजेश वानखडे बोलत होते.व्यासपीठावर विशेष अतिथी म्हणून शिक्षक आ. किरण सरनाईक ,माजी मंत्री वसुधा देशमुख ,संस्थेचे उपाध्यक्ष विशाल देशमुख तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा निलांबरी देशमुख यांची उपस्थिती होती. शिक्षक आ. किरण सरनाईक यांनी विचार व्यक्त केले. आजच्या काळात एखादी संस्था चालवणे फार संघर्षाचे, कठीण झालेले आहे.प्रत्येक क्षेत्रामध्ये बदल झालेले आहेत. त्यामध्ये शिक्षण क्षेत्र हे अव्वल आहे. त्यामुळे शिक्षण संस्था चालवताना अडचणीचा सामना करावा लागत आहे. अशा संघर्ष करणाऱ्या संस्थांना मदत करणे सर्वांचे काम असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री वसुधा देशमुख यांनी केले. श्रीराम शिक्षण संस्था संचालित श्रीराम हायस्कूलच्या वतीने स्नेह संमेलन व कृतज्ञता सोहळा निमित्त मान्यवरांचा सत्कार करण्यात आला विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर केला. या कार्यक्रमाला विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन नरेंद्र सांगोले यांनी, आभार सविता बेलसरे यानी तर प्रास्ताविक प्राचार्य उमेश सोलव यांनी केले.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत राज्याने ओलांडला लाखाचा टप्पा

## अमरावती ५७९५ घरावर सौर ऊर्जा निर्मिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी सुरू केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने बुधवारी एक लाख घरांचा टप्पा ओलांडला, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वसामान्य ग्राहकांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. या योजनेत घराच्या छतावर सौर ऊर्जानिर्मिती पॅनेल्स बसवून वीज निर्माण केली जाते. घरगुती वापरापेक्षा जास्त वीज तयार झाल्यामुळे वीजबिल शून्य होते तसेच अतिरिक्त वीज महावितरणच्या जाळ्यात पाठवून उत्पन्नही मिळते. छतावर सौर ऊर्जा पॅनेल्स बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून तीन किलोवॅटला ७८ हजार रुपयांपर्यंत थेट अनुदान मिळते.

घरगुती ग्राहकांच्या मदतीसाठी पंतप्रधान मोदी यांनी गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात ही योजना सुरू केली होती. राज्यात दि. २१ जानेवारीअखेर या योजनेत एकूण १,००,७०० घरांवर सौर ऊर्जा प्रकल्प बसविले गेले. त्यामध्ये ३९२ मेगावॅटची क्षमता निर्माण झाली व ग्राहकांना ७८३ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले. दि. २१ जानेवारी रोजी एका दिवसात ११९५ घरांवर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविले.




राज्यात नागपूर जिल्ह्याने सर्वाधिक १६,९४९ घरांवर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसवून प्रथम क्रमांक मिळविला आहे. पुणे (७९३१ घरे), जळगाव (७५१४ घरे), छत्रपती संभाजीनगर (७००८ घरे), नाशिक (६६२६ घरे), अमरावती (५७९५ घरे) आणि कोल्हापूर (५०२४ घरे) हे जिल्हे योजनेचा लाभ घेण्यात आघाडीवर आहेत.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महावितरणकडे आहे. या योजनेतील ग्राहकांना मोफत नेट मीटर देण्याचा निर्णय महावितरणने घेतला आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना https://pmsuryaghar.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. त्यांना केंद्र सरकारकडून एक किलोवॅट क्षमतेच्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी तीस हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेसाठी साठ हजार रुपये तर तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेसाठी ७८ हजार रुपये थेट अनुदान मिळते.

घरगुती वीज ग्राहकांना छतावर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविता यावा यासाठी बँकांकडून माफत व्याजदरात कर्ज उपलब्ध केले जात आहे तसेच कर्जाची प्रक्रियाही सुलभ करण्यात आली आहे.

या योजनेचा लाभ घेण्यास ग्रामीण ग्राहकांना प्रोत्साहन देणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन निधीही देण्यात येणार आहे.

# तुरीचे दर घसरणीला, तरीही शुल्कमुक्त आयातीला मुदतवाढ

## सोयाबीनच्या घटत्या दराने शेतकऱ्यांची घोर निराशा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

खरीप हंगामातील सोयाबीनच्या घटत्या दराने शेतकऱ्यांची घोर निराशा केली असताना आता तुरीच्या दरालाही उतरती कळा लागली आहे. महिन्याभरापूर्वी तुरीला प्रतिक्विंटल दहा हजार रुपये दर होता त्यावेळेस सोयाबीनची भरपाई तुरीतून निघेल अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र तुरीचे दर हमीभावापेक्षा खाली आले आहेत. केंद्र सरकारने शुल्कमुक्त तूर आयातीला एक वर्षाची मुदतवाढ दिल्याने नवे संकट समोर आले आहे.



देशातील तुरीचे उत्पादन गेली सलग दोन वर्षे कमी झाले होते. त्यामुळे तुरीच्या भावात वाढ झाली होती. मागील हंगामात देशात केवळ ३४ लाख टन तुरीचे उत्पादन झाले होते. तर देशाला वर्षाला ४५ ते ४६ लाख टन तूर लागते. तुरीचा उच्चांकी भाव मागील हंगामात १२ हजार ५०० रुपयांपर्यंत पोहचला होता. तुरीचे वाढते भाव लक्षात घेता सरकारने तुरीच्या आयातीवरील शुल्क कमी करून शुल्कमुक्त आयात सुरु केली. तसेच आयातीवर कोणत्याही प्रकारचे बंधन ठेवण्यात आले नाही. चालू आर्थिक वर्षात नोव्हेंबरपर्यंत जवळपास १० लाख टन तूर आयात झाली आहे. यंदा उत्पादनही वाढीचा अंदाज असून नव्या तुरीची आवक महीनाभरात वाढणार आहे. तरीही सरकारने शूल्कमुक्त आयातीला मुदतवाढ का दिली, असा सवाल केला जात आहे. त्याचा परिणाम बाजारावर जाणवणार आहे.

खरीप हंगामातील तूर पिकाला आंतरीक नगदी पीक म्हणून पाहिले जाते, मागील वर्षी तुरीला १२ हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला होता. तुरीच्या दरातील तेजी बघता यंदा शेतकऱ्यांनी खरीप हंगामात तुरीची पेरणी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी केली. यावर्षी सोयाबीन पिकाने शेतकऱ्यांना दग दिला. नैसर्गिक संकट व किडींच्या प्रादुर्भावामुळे उत्पादन खर्चही वसूल झाला नाही. यामुळे शेतकऱ्यांची सर्व भिस्त आंतरीक नगदी तूर पिकावर होती. सध्या विदर्भात तूर पिक काढणीचा हंगाम सुरू आहे. प्रतिकूल हवामानामुळे तूर पिकाची उत्पादकता कमी झाली आहे.

काही भागातील तूर कापणी झाल्याने नवीन तूर बाजारात विक्रीसाठी येत आहे. बाजारात तुरीला ६५०० ते ७००० रूपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. सध्या बाजारात आवक अल्प असुन येणाऱ्या काळात बाजारपेठेत तुरीची आवक वाढणार आहे. केंद्र सरकारने तुरीला ७५५० रूपये एवढा हमीभाव भाव जाहीर केला आहे. या दरापेक्षाही बाजारात तुरीला कमी भाव मिळत आहे. हमीभावाने शासकीय खरेदी सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

सरकारने ३१ मार्च २०२५ पर्यंत तुरीच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिली होती. पण ही मुदत संपण्याधीच सरकारने पुन्हा एक वर्षाची मुदतवाढ दिली. सरकारने देशातील तुरीची पुरवठा वाढविण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

# जिल्हास्तरीय हॅकेथॉन स्पर्धेत मनपा मराठी शाळा क्रमांक १८ जिल्ह्यातून प्रथम

## शाळेची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

स्टार्स प्रकल्पांतर्गत हॅकेथॉन या उपक्रमांतर्गत इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २१ व्या शतकातील कौशल्याची रुजवणूक करण्यासाठी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेबाबत जागृती करण्यात येणार आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील ३४७ शाळांनी नोंदणी केली होती. त्यामधून एकूण ८४ शाळांची जिल्हास्तरीय प्रदर्शनीकरिता निवड करण्यात आली होती.

त्या अनुषंगाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय हॅकेथॉन प्रदर्शनी २०२४ -२५ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था टोपे नगर अमरावती येथे आयोजित आली होती.त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था या गटातून मनपा उच्च प्राथमिक मराठी शाळा क्रमांक १८ प्रवीण नगर या शाळेने प्रथम क्रमांक पटकावला व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शाळेची निवड करण्यात आली. निवडीबाबत मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व मोमेंटो देऊन गौरविण्यात आले.

सदर उपक्रमात शाळेतील शिक्षिका कु वैशाली महाजन व इयत्ता सातवीचे अमान अन्सारी व राज गुळदे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.मॉडेल तयार करण्याकरीता शाळेचे मुख्याध्यापक श्री सुधीर धोत्रे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच गौरव परणकर यांनी विशेष सहकार्य केले. त्यांच्या या यशाबद्दल मा. शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांनी शाळेचे अभिनंदन केले तसेच महानगरपालिकेतील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांनी शाळेच्या यशाबद्दल अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

तसेच या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी संबंधित शिक्षिका व विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल असोसिएशन अमरावती निवडणूक प्रक्रिया प्रारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

अमरावती एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल असोसिएशनची दर ३ वर्षानंतर होणारी निवडणूकीची प्रक्रिया दि. ०६/०१/२०२५ पासून सुरु झाली आहे. दि. ०२/०२/२०२५ रोजी संपन्न होणाऱ्या निवडणुकीकरिता एम.आय.डी.सी. इंडस्ट्रीयल असोसिएशनच्या कार्यालयामध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणूक प्रक्रियेत एकंदर १६० मतदाते मतदान करणार असून उमेदवारांच्या निवडीकरिता वातावरण निर्मिती झालेली असून या निवडणूक प्रक्रियेत मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून श्री. बाळासाहेब देशपांडे, निवडणूक अधिकारी श्री. किशोर बेंद्रे व ॲड. श्री. राजेंद्र पांडे हे कामकाज पाहत आहेत.

या निवडणूक प्रक्रियेत मतदात्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडावी असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी श्री. बाळासाहेब देशपांडे यांनी केले आहे. या सर्व निवडणूक प्रक्रियेत एम.आय.डी.सी. इंडस्ट्रीयल असोसिएशनचे व्यवस्थापक श्री. नंदकिशोर पेटले तसेच श्री स्वप्नील कोरेवार, श्री गौतम वडे हे निवडणूक अधिकाऱ्यांचे अधीन राहून कामकाज पाहत आहेत.

### निवडणूक कार्यक्रम पुढीलप्रमाणे

| तारीख | निवडणूक कार्यक्रम |
|---|---|
| २२/०१/२०२५ (बुधवार) ते २३/०१/२०२५ (गुरुवार) | नामांकन अर्ज वितरण सकाळी ११:०० ते दुपारी ३:०० वाजेपर्यंत |
| २४/०१/२०२५ (शुक्रवार) | नामांकन अर्ज स्वीकारणे सकाळी ११:०० ते दुपारी ३:०० वाजेपर्यंत |
| २५/०१/२०२५ (शनिवार) | नामाकन अर्ज पडताळणी सकाळी ११:०० ते दुपारी ३:०० वाजेपर्यंत |
| २७/०१/२०२५ (सोमवार) | नामाकन अर्ज परत घेणे सकाळी ११:०० ते दुपारी ३:०० वाजेपर्यंत |
| २८/०९/२०२५ (मंगळवार) | उमेदवारांची अतिम यादी लावणे सकाळी ११:०० ते दुपारी ३:०० वाजेपर्यंत |
| ०२/०२/२०२५ (रविवार) | निवडणूक मतदान दुपारी १:०० ते दुपारी ५:०० वाजेपर्यंत |

# नेरपिंगळाईत महीलांकरीता प्रसाधन गृह नसल्यानी महिला त्रस्त

## दैनिक विदर्भ प्रजासत्ताक मध्ये बातमी प्रकाशित होताच ग्रामपंचायतीचा मोठा खुलासा : मंजुरात प्रसाधन गृह होणार पंधरा दिवसात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नेरपिंगळाई**

नेरपिंगळाई गावात मुख्यरस्त्यांवर महीलानकरीता प्रसाधन गृह महिलांचे हाल ही बातमी लोकप्रिय सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक नी दि.१८ (शनिवार) रोजी प्रकशित करताच ग्रापंचायत ने या बातमीची दखल घेत मोठा खुलासा करीत २०२२ मध्ये मंजूर असलेले प्रसाधन गृहाच काम येत्या १५दिवसांत काम सुरू करण्याचे आश्वासन दीले आहे.


विदर्भ प्रजासत्ताक
नेरपिंगळाईत महीलांकरीता प्रसाधन गृह नसल्याने महिला त्रस्त




नेरपिंगळाई. गाव आजूबाजुच्या खेड्यांची बाजारपेठ असल्याने गावामध्ये अनेक महिला आरोग्याची समस्या असल्यास प्राथमिक आरोग्य केंद्रात कीवा लाडकी बहिण चे पैसै काढायचे असल्यास बँके मध्ये किवा सेतु केंद्रात सोनेचांदी विकत घ्यायचे असल्यास सोनाराच्या दुकानात कपडा खरेदी करायची असल्यास कापड दुकानात किवा सुपरबाजार किंवा किराणा दुकानात किराणा खरेदी करण्यास मोठ्या प्रमाणात येतात त्यात गावात येजा करतांना अनेक महिला बाहेर गावा वरून तिवसा चांदुरबाजार रत्यावरून येजा करतात मात्र या रस्त्यावर योग्य प्रसाधन गृह नसल्याची बातमी विदर्भ प्रजासतक ने प्रकाशित करताच मोठा खुलासा पुढे आला सदर प्रसाधन गृह २०२२ चे ४००००० व २०२३ मध्ये ४००००० मंजूर असून उद्घाटन सुद्धा झाले असल्याचे कळले मात्र वॉर्ड नंबर २ चें प्रसाधन गृहाचे काम मात्र लागले नसल्यानी दिनाक २२ला बातमी मुळे ग्रामपंचायत मीटिंग मध्ये या वर चर्चा गाजली आणि ग्रामपंचायत चे ग्रामसेवक विनोद मनवर यांनी १५दिवसांत प्रसाधन काम सुरू करू अशे आश्वासन दिले.सदर विषयाला विदर्भ प्रजासत्ताक ने समोर आणल्याने ग्रामस्थांनी दैनिक विदर्भ प्रजासत्ताक के आभार मानलेत.

# खेळांत चमका अन् पुरस्कार मिळवा : राज्यस्तरावर कामगिरी : क्रीडा विभागाकडून सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या खेळाडूंना शासनाच्या क्रीडा विभागाद्वारे 'शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार' प्रदान केला जातो. या पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यास सुरुवात झालेली आहे. राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंसह मार्गदर्शकांना पुरस्कार मिळणार आहे.

२०२३-२४ यावर्षीच्या क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आलेले आहेत. क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ क्रीडामहर्षीकरिता जीवनगौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांकरिता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक), खेळाडूंसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार, साहसी उपक्रमांकरिता शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार, दिव्यांग खेळाडूंसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार, आदी पुरस्कार शासनाकडून प्रदान करण्यात येतात. या पुरस्कारासाठी जिल्ह्यातील खेळाडू व मार्गदर्शकांना प्रस्ताव सादर करण्याची संधी प्राप्त झालेली आहे. अधिकाधिक खेळाडूंनी यासाठी अर्ज सादर करावेत, असे कळविले आहे.क्रीडा विभागाच्या sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर स्क्रोलिंग लिंकमध्ये उपलब्ध करून दिलेल्या लिंकवर क्लिक करून अर्ज सादर करता येतो.खेळाडूने क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या संकेतस्थळाला भेट देऊन १४ ते २६ जानेवारी या कालावधीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराचे स्वरूप काय?**

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार हा व्यक्तिगत स्वरूपाचा असून तीन लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# एक चार पाच सहा सात; ज्येष्ठांना मदतीसाठी १४५६७ हेल्पलाईन

## सामाजिक न्याय विभाग व जनसेवा फौंडेशनचा संयुक्त उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अकोला**

केंद्र व राज्य शासनाचा सामाजिक न्याय विभाग, राष्ट्रीय समाज रक्षा संस्थान आणि जनसेवा फौंडेशनच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांना मदतीसाठी १४५६७ (एक चार पाच सहा सात) ही हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या विविध अडचणी सोडविणे, त्यांच्या तक्रारींचे निवारण करणे, तसेच त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणे, अत्याचारग्रस्त वृध्द व्यक्तींची काळजी घेण्यासाठी व इतर सेवांसाठी वेळोवेळी हेल्पलाईनचा उपयोग होणार आहे. टोल फ्री क्रमांक एक चार पाच सहा सात ही हेल्पलाईन सकाळी आठ ते रात्री आठ वाजेपर्यंत रोज सुरू राहील. केवळ २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, २ ऑक्टोबर व १ मे




वगळता वर्षभर सेवा सुरू राहील, अशी माहिती जनसेवा फौंडेशनच्या क्षेत्रीय प्रतिनिधी राजेंद्र आहेर यांनी दिली.

**आरोग्यविषयक जागृतीसह मिळणार कायद्याचीही माहिती**

हेल्पलाईनमार्फत आरोग्यविषयक जागरूकता, निदान, उपचार मिळवून देणे, निवारा, डे केअर सेंटर, पोषणविषयक, ज्येष्ठांसाठीची अनुकूल उत्पादने, सांस्कृतिक, आध्यात्मिक, कला व करमणूकीची माहिती दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे, कायदेविषयक मार्गदर्शन, विवादांचे निराकरण, पेन्शनसंबंधित मार्गदर्शन, मृत्यूपूर्वीचे आवश्यक दस्तऐवजीकरण व विविध शासकीय योजनांची माहितीही दिली जाणार आहे.

**मानसिक ताणतणावांचे व्यवस्थापन**

चिंता निराकरण, नातेसंबंध व जीवन व्यवस्थापन, मृत्यूशी संबंधित शोक, वेळ, ताणतणाव, राग व्यवस्थापन, आदींबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. हेल्पलाईनबाबत अधिकाधिक जनजागृती करून ज्येष्ठांना हेल्पलाईनचा वापर करण्यास प्रोत्साहित करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी दिले आहेत.

# विधानसभेत ठाकरेंचा तर विधानपरिषदेत काँग्रेसचा विरोधी पक्षनेता; बैठकीत निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई**

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचं पानिपत झालं. विधानसभेत विरोधी पक्षनेते पद मिळेल इतक्याही जागा विरोधी पक्षांना निवडून आणता आल्या नाहीत. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनातही महाविकास आघाडीला अनेक अडचणी आल्या होत्या. आता एक मोठी बातमी समोर आली आहे. मंगळवारी झालेल्या महाविकास आघाडीच्या बैठकीत विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद ठाकरे गटाला तर विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते पद काँग्रेसला देण्याचा निर्णय झाला. शिवसेना उबाठा पक्षाच्या कार्यालयात महाविकास आघाडीची एकत्रित बैठक पार पडली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे.

महाविकास आघाडीचे वरिष्ठ नेते लवकरच या निर्णयावर शिक्कामोर्तब करतील अशी शक्यता आहे.